| | |
|---|---|
| MHKO070006772015 | **रे.क.नं.११८/२०१५ मधील नि.७० वरील आदेश**<br>आनंदा राऊ भोसले<br>वि.<br>भाऊ राऊ भोसले आणि इतर |

१. वादीने सदरचा अर्ज हा साक्षीदार संजय भिमराव गवळी, परीरक्षण भुमापक, नगरभुमापन अधिकारी, इचलकरंजी यांना साक्षीसमन्स पाठविण्याकरीता अर्ज केलेला आहे. सदर अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे दाखल करुन सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

२. वादीतर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, पुर्वी मोजणीदार श्रीकांत भोसले यांना समन्स काढले असता सदरची मोजणी ही संजय भिमराव गवळी यांनी केली असल्याचे सांगीतले. त्यामुळे त्यांना साक्षीसमन्स काढण्याविषयी विनंती केली आहे. उलटपक्षी प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी असा युक्तीवाद केला की, वादी हे विलंबाने प्रस्तुत साक्षीदारास समन्स काढुन मागत आहेत. अलहिदा सदरचे काम युक्तीवादावर असताना वादी यांनी नि.६५ ते ६७ कडे अर्ज देवून बेकायदेशिर आदेश घेतले आहेत. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे.

३. वादींतर्फे विधिज्ञ यांचा अर्ज, त्यास प्रतिवादीतर्फे विधिज्ञ यांनी दिलेले म्हणणे, तसेच दोन्ही बाजुंचा युक्तिवाद यांचा विचार करणेत येवून खालील मुद्दे माझे विचारार्थ आले असून त्यावरील निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदविणेत आले आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १) | प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणेस पात्र आहे का ? | होय. |
| २) | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारण मिमांसा

**मुद्दे क्र.१ व २ बाबतः–**

४. प्रस्तुतचा दावा हा वादी यांनी कायम व अज्ञार्थी मनाईकरिता दाखल केलेला आहे. सदर कामी माझे पुर्व पिठासिन अधिकारी यांनी नि.३८ वर मुद्दे काढलेले आहेत. त्याचबरोबर सदर कामी कोर्ट कमिशन द्वारे न.भु.क्र.२८३ ची मोजणी देखील झाल्याचे नि.३६ कडे दाखल असलेल्या अहवालावरुन दिसुन येते. त्याचबरोबर नि.३८ वरील मुद्दा क्र.२ चे अवलोकन केले असता सदरचा मुद्दा हा अतिक्रमणाबाबत असुन त्याच्या शाबितीची जबाबदारी वादी यांच्यावर असल्याचे दिसुन येते. त्यामुळे दाव्याचे स्वरुप व निघालेले मुद्द पाहता प्रस्तुत साक्षीदाराची साक्ष महत्वाची दिसुन येते. प्रस्तुत साक्षीदारास साक्षीदार म्हणुन तपासलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान संभवत नाही. उलट खरी परिस्थीती अभिलेखावर येण्यास मदतच होईल.

५. सबब, वरील सर्व बाबींचा विचार केला असता तसेच अर्जात नमूद कारण पाहता याकामी वादी यांना प्रस्तुत साक्षीदार तपासणेची संधी देणे येथे ईष्ट होईल. सबब, वर नमूद कारणमिमांसेचा विचार करुन मी या निष्कर्षापर्यंत येत आहे की, सदरचा वादी यांचा अर्ज मंजूर होणेस पात्र आहे. त्यामुळे अर्जात नमुद केलेप्रमाणे साक्षीदारास नियमाप्रमाणे साक्षीभत्ता भरलेनंतर साक्षीसमन्स काढण्यात यावे व अर्जात नमुद केलेली कागदपत्रे घेवून येणेबाबत प्रस्तुत साक्षीदाराला आदेशीत करण्यात येते.

PATIL MAYUR SAMPAT
Digitally signed by PATIL MAYUR SAMPAT
Date: 2025.08.14 13:42:59 +0530

दि.१४/०८/२०२५

**(एम.एस.पाटील)**

दुसरे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,

जयसिंगपूर